# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः27.01.2025** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या**

76 वा प्रजासत्ताक दिन देशभरात उत्साहात साजरा, कर्तव्य पथावर बहारदार संचलनाने डोळ्याचे पारणे फेडले

प्रजासत्ताक दिनानिमित्त जगभरातून भारताला शुभेच्छा,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आज राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक मेळाव्याला संबोधन

उत्तराखंडमध्ये आजपासून समान नागरी कायदा लागू होणार

जागतिक कीर्तीचे हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर चेरियन याचं वयाच्या 88 व्या वर्षी काल निधन **आणि**

खेलो इंडिया हिवाळी स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याचा आज समारोप.

**प्रजासत्ताकदिन**

76 वा प्रजासत्ताक दिन काल देशभरात उत्साहात साजरा झाला. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर कर्तव्य पथावर बहारदार संचलन झाले. इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्राबोवो सुबियांतो यावेळी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तत्पुर्वी पंतप्रधान नरेंद्र राष्ट्रीय युद्ध स्मारकावर जाऊन त्यांनी शहिदांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी इंडोनेशियाचे 160 सदस्यांचे दल आणि 190 सदस्यांचा बँड संचलनामध्ये सहबागी झाला होता. यावेळी प्रथमच लष्कराच्या तीनही दलांचा चित्ररथ संचलनात सहभागी झाला होता. संचलनामध्ये इतर राज्यांच्या चित्ररथाबरोबरच, लष्कराच्या क्षमतेचे दर्शन घडवणाऱ्या

लढाऊ साधनांचेही प्रदर्शन करण्यात आले त्यामध्ये टँक टी 90, ब्राह्मोस, पिनाका बहुप्रक्षेपक रॉकेट सिस्टिम, अग्निबाण मल्टि-बॅरेल रॉकेट प्रक्षेपकाचा समावेश होता. संचलनाची सांगता 47 विमानांच्या आकाशातल्या सलामीनं झाली.

**स्वागत समारंभ**

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी काल इंडोनेशियाच्या राष्ट्राध्यक्ष सुबियांतो यांच्यासाठी गृह स्वागत समारंभ आयोजित केला होता. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवरांनी समारंभाला उपस्थिती लावली होती. राष्ट्रपतींनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशामध्ये, समारंभात आयोजित सांस्कृतिक आणि कलाआधारित कार्यक्रम परदेशी पाहुण्यांना आवडल्याचं म्हटलं आहे.

**प्रजासत्ताक शुभेच्छा**

राष्ट्राच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त, विविध राष्ट्राच्या अध्यक्षांनी भारताला शुभेच्छा दिल्या आहेत. मालदिव्जचे अध्यक्ष मोहम्मद मुईझ्झू यांनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, मालदीव नेहमीच भारतासोबत परस्पर विश्वास, आदर आणि समजुतीवर आधारलेल्या मैत्री आणि सहकार्याचे बंध जपेल असं म्हटलं आहे. भूतानचे पंतप्रधान त्शेरिंग टोबगे यांनीही भारताला शुभेच्छा देताना भारताची एकता आणि दृष्टीकोन उल्लेखनीय कामगिरी करत असून त्यामुळे जगाला प्रेरणा मिळते तर नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनीही लोकशाही आणि राष्ट्रीय एकतेचे आदर्श उभय राष्ट्रांमधील मैत्रीचे अधिक दृढ संबंध करतील असं शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपतींना शुभेच्छा दिल्या आहेत.

**वैष्णव संवाद**

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दिल्लीतल्या आकाशवाणी भवनामध्ये मन की बात कार्यक्रमांत उल्लेख केलेल्या नागरिकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. या 139 नागरिकांना विशेष अतिथी म्हणून प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात

आमंत्रित कऱण्यात आलं होतं. प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत सहगल तसंच आकाशवाणीचे उच्चपदस्थ अधिकारीही यावेळी उपस्थित होते.

**पंतप्रधान एनसीसी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक पंतप्रधान मेळाव्याला संबोधित करतील. जनरल करिअप्पा परेड मैदानावर होणाऱ्या या मेळाव्याची यावर्षीची संकल्पना ही 'युवा शक्ती विकसित भारत' अशी आहे. यादरम्यान, 800 छात्रांकडून, राष्ट्र उभारणीसाठी एनसीसीची वचनबद्धता दर्शवणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचं सादरीकरण होणार आहे. या कार्यक्रमात 18 मित्र देशांतील 144 छात्रही प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत. शिक्षण मंत्रालय आणि आदिवासी व्यवहार मंत्रालयाच्या मेरा युवा भारत योजनेच्या साडेसहाशे स्वयंसेवकांची विशेष पाहुणे म्हणून उपस्थिती असेल.

**समान- नागरी- कायदा**

उत्तराखंडमध्ये आजपासून समान नागरी कायदा लागू होणार आहे.  हा कायदा लागू करणारं देशातील हे पहिलंच राज्य असून यासंदर्भातील सर्व नियमांची अंमलबजावणी, अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण आणि इतर तयारी पूर्ण झाली असल्याचं मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांनी स्पष्ट केलं आहे. समान नागरी कायद्यासंदर्भातील एका संकेतस्थळाचं अनावरणही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. जात, धर्म आणि लिंगाधारित नागरी कायदे तसंच लग्न,घटस्फोट, वारसाहक्क आदी अधिकार सर्वांना समान असावेत यासाठी हा कायदा महत्वाचा आहे.असं धामी यांनी सांगितलं.

**गोयल-ओमान**

11 व्या संयुक्त आयोगाच्या बैठकीसाठी वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आजपासून मस्कतच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. भेटीदरम्यान गोयल ओमानचे वाणिज्य, उद्योग आणि गुंतवणूक प्रोत्साहन मंत्री कैस बिन मोहम्मद बिन मुसा अल युसेफ यांच्याशी चर्चा करतील. उभय देशांचे मंत्री व्यापार, गुंतवणूक आणि जागतिक आर्थिक परिस्थितीवर चर्चा करतील. या भेटीमुळे ओमानसमवेत व्यापार आणि गुंतवणूक संबंधांबद्दल देशाची

वचनबद्धता अधोरेखित होणार असून उभय देशांतील संबंध अधिक मजबूत होण्यास मदत होईल असं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**महाकुंभ - गृहमंत्री**

केंद्रिय गृहमंत्री अमित शहा आज उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभ मध्ये सहभागी होणार आहेत. त्रिवेणीसंगमावर स्नान केल्या नंतर ते पुरी आणि द्वारका येथील शंकराचार्यांची तसंच इतर संतांची भेट घेणार आहेत. दरम्यान, येत्या 29 तारखेला मौनी अमावस्येच्या पार्श्वभूमीवर भाविकांची गर्दी होण्याची शक्याता लक्षात घेऊन महाकुंभ मेला क्षेत्र वाहनविरहित क्षेत्र म्हणून घोषित केलं आहे. गर्दीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी तसंच जास्त गर्दी होणार नाही याची खात्री करण्यासाठी एकात्मिक नियंत्रण आणि सूचना केंद्र सक्रिय करण्यात आलं आहे. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी जास्त गर्दी असलेल्या भागात जलद प्रतिसाद पथकं तैनात करण्यात आली आहेत.

महाकुंभ मेळ्याचं औचित्य साधून महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या वतीनं महिला सक्षमीकरण आणि महिलांचे अधिकार याविषयी जनजागृती करणारी दालनं उभारली आहेत. याबरोबरच देशभरातील कलाकारांनी तयार केलेली हस्तकला, विविध कलाकृती असलेली वस्त्र, जैविक उत्पादनं विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

**बांग्लादेश मदत**

युनायटेड स्टेट्स एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंटने बांग्लादेशला केली जाणारी सर्व आर्थिक मदत थांबवली आहे. बांग्लादेशातल्या सर्व अंमलबजावणी भागीदारांना पाठवलेल्या पत्रात, अनुदान, सहकारी करार किंवा इतर सहाय्य थांबवण्याचे अथवा बंद करण्याचे आदेश दिले आहेत. तत्पुर्वी ट्रम्प प्रशासनाने शुक्रवारपासून इस्त्रायल, इजिप्त आणि  आहार कार्यक्रम वगळता जवळपास सर्व परदेशी मदत गोठवली आहे. अमेरिकेच्या सरकारनं अचानक जाहीर केलेल्या या निर्णयामुळे बांगलादेशात कार्यरत असलेल्या अमेरिकच्या अनुदानावर अवलंबून असलेल्या गैर-सरकारी संस्थांसह विविध प्रकल्प भागधारकांमध्ये चिंतेचं वातावरण आहे.

**मच्छिमार अटक**

श्रीलंकेच्या नौदलानं दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये 34 भारतीय मच्छिमारांना अटक केली आहे. बेकायदेशीर मासेमारीसाठीच्या तीन ट्रॉलिंग बोटीही जप्त केल्या आहेत. या बोटींनी आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषेचे उल्लंघन केल्याबद्दल त्या ताब्यात घेण्यात आल्या आहेत. यापूर्वीही, 41 भारतीय मच्छिमारांना देशात परत पाठवण्यात आलं असल्याची माहिती भारतीय उच्चायुक्तालयानं दिली आहे. मच्छिमार संघटनांनी या अटकेचा निषेध केला आणि केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात दंड न लावता मच्छिमारांना सोडण्यासाठी कारवाई करण्याची विनंती केली.

**बोट- अपघात**

हैद्राबादमध्ये हुसेनसागर तलावातील बोटीवर काल आयोजित भारत माता महाआरती कार्यक्रमांतील आतषबाजीदरम्यान आग लागली. या कार्कारमासाठी वापरण्यात आलेल्या दोनही बोट जळून खाक झाल्या. बोटीवरील 15 नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यात सुरक्षा यंत्रणांना यश आलं. प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर भारत माता संघटनच्या वतीनं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. भाजपाचे तलंगणाचे प्रदेशाध्यक्ष जी किशन रेड्डी यावेळी उपस्थित होते.

**चेरियन**

जागतिक कीर्तीचे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. चेरियन यांचं काल बंगळुरू इथं निधन झालं. ते 82 वर्षांचे होते. भारतीय रुग्णावर त्यांनी सर्वप्रथम हृदय फुफ्फुस प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया केली होती. मणिपालच्या कस्तुरबा गांधी विद्यालय, रुग्णालयातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्यांनी ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये त्यांनी हृदयशस्त्रक्रियेचे प्रशिक्षण घेतले. राष्ट्रपतींचे मानद हृदयरोग शल्यचिकित्सक म्हणून त्यांची ओळख होती. लहान मुलांप्रती त्यांचा कनवाळू दृष्टीकोन होता तर त्यांनी 20 इराकी मुलांवरही हृदय शस्त्रक्रिया केली होती. तसंच इराकमध्ये तुरूंगात असलेल्या चार भारतीय वाहनचालकांच्या सुटकेसाठी राजनयिक भूमिका निभावली होती.

**क्रिकेट महिला**

19 वर्षांखालील मुलींच्या वीस षटकांच्या विश्वकरंडक स्पर्धेत, भारतीय संघानं बांग्लादेशला 8 गडी राखून नमवत उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. बांग्लादेशचा संघ निर्धारीत वीस षटकांत 8 गडी गमावून 64 धावा केल्या. भारताच्या त्रिशानं 31 चेंडूत 8 चौकारांसह केलेल्या 40 धावांच्या मदतीने केवळ सात षटक आणि एका चेंडूत लक्ष्य गाठलं.

### खेलो इंडिया

खेलो इंडियाच्या हिवाळी स्पर्धांच्या पहिल्या टप्प्याची आज सांगता होणार आहे. भारतीय लष्कर आणि भारत-तिबेट सीमा पोलिसांनी पुरूषांच्या आईस हॉकीमध्ये आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले. आज अंतिम सामना होणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र पदकतालिकेत अव्वल स्थानावर पोचला आहे. स्पर्धेत महाराष्ट्राने 2 सुवर्ण, 2 रौप्य आणि 4 कास्य पदक जिंकली आहेत.

**याबरोबरच हे बातमीपत्र संपलं नमस्कार.**